असा. क्र. १३ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, मार्च ६, २००४ / फाल्गुन १६, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

### अनुक्रमणिका

पृष्ठे

सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.–महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. .. .. ६६—६८

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मार्च २००४

**MAHARASHTRA ORDINANCE No. IV OF 2004.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

**सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९६६ चा महा ४१. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २००४ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, ताबडतोब अंमलात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४क ची सुधारणा.

२. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश '' उक्त संहिता '' असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४४क च्या,-- १९६६ चा महा. ४१.

(क) पोट-कलम (१) मध्ये,--

(एक) खंड (दोन) च्या शेवटी '' ; किंवा '' हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (दोन) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :--

'' (तीन) खाजगी विकासकाने विशेष वसाहत प्रकल्प म्हणून हाती घेतलेले क्षेत्र '';

(तीन) शेवटच्या परिच्छेदामध्ये, '' खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी रूपांतर '' या मजकुरानंतर '' किंवा यथास्थिती, विशेष वसाहत प्रकल्प '' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(चार) शर्त (ख) मध्ये, '' खराखुरा औद्योगिक वापर '' या मजकूरानंतर ''किंवा यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्प,'' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(पाच) शर्त (घ) मध्ये, '' उद्योग '' या मजकुरानंतर '' किंवा यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्प, '' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(सहा) शर्त (ङ) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :--

'' परंतु, केंद्र सरकारकडून पर्यावरण-संवेदनशील क्षेत्र म्हणून अधिसूचित केलेल्या क्षेत्रास या पोट-कलमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.'';

(ख) पोट-कलम (२) मध्ये, '' खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी '' या मजकुरानंतर '' किंवा यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्पासाठी '' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(ग) पोट-कलम (५) मध्ये, '' खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासंबंधीची '' या मजकुरानंतर '' किंवा यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्पासंबंधीची,'' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(घ) स्पष्टीकरणामध्ये, '' किंवा औद्योगिक व्यवसाय किंवा उपक्रम '' या मजकुरानंतर '' किंवा, पर्यटनस्थळ किंवा गिरीस्थान म्हणून राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील पर्यटनाचा उपक्रम,'' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल आणि तो १ जुलै २००० पासून समाविष्ट केला असल्याचे मानण्यात येईल ;

(ङ) विद्यमान स्पष्टीकरणाला स्पष्टीकरण-एक असा नवीन क्रमांक दिला जाईल व नवीन क्रमांक दिलेल्या स्पष्टीकरण-एक नंतर पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :--

'' **स्पष्टीकरण-दोन.**--या कलमाच्या प्रयोजनांसाठी, ''विशेष वसाहत प्रकल्प '' याचा अर्थ, '' महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींखालील, शासनाने विशेष वसाहतीच्या विकासासाठी केलेल्या विनियमांखालील विशेष वसाहत प्रकल्प अथवा प्रकल्प, असा आहे.''. १९६६ चा महा. ३७.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३२८ ची सुधारणा.

३. उक्त संहितेच्या कलम ३२८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (सोळा-क) मध्ये, '' जमिनीचा खराखुरा औद्योगिक वापर '' या मजकुरानंतर '' किंवा विशेष वसाहत प्रकल्पासाठी वापर '' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

## निवेदन

औद्योगिक वाढीला चालना देण्याच्या आणि उद्योजकांना महाराष्ट्र राज्यामध्ये उद्योगधंदे सुरू करण्याकरिता प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र शासनाने १९९३ चे नवीन औद्योगिक धोरण जाहीर केलेले आहे. उक्त औद्योगिक धोरणाचा एक भाग म्हणून, संबंधित जमीन एखाद्या औद्योगिक क्षेत्रात स्थित असल्यास तिचे खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी (*bona fide* industrial use) रूपांतर करण्याकरिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलमे ४२ व ४४ अन्वये जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीची आवश्यकता असणार नाही, अशी तरतूद करण्यासाठी, सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याद्वारे, उक्त संहितेच्या कलम ४४क मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. खराखुरा औद्योगिक वापर म्हणून समजल्या जाणाऱ्या उपक्रमांचा अंतर्भाव उक्त कलम ४४क च्या **स्पष्टीकरणा**मध्ये करण्यात आलेला आहे.

२. सन १९९९ मध्ये, महाराष्ट्र शासनाने " नवीन पर्यटन धोरण " जाहीर केले असून त्यामध्ये पर्यटनाला उद्योगाचा दर्जा दिलेला आहे. राज्यातील पर्यटन उद्योगाला १९९३ च्या नवीन औद्योगिक धोरणाचे सर्व लाभ मिळवून देण्यासाठी, उक्त कलम ४४ क च्या **स्पष्टीकरणा**मध्ये दिनांक १ जुलै २००० पासून भूतलक्षी प्रभावाने योग्य त्या सुधारणा करून, राज्य शासनाने पर्यटन स्थळ किंवा गिरिस्थान म्हणून अधिसूचित केलेल्या क्षेत्रांतील पर्यटनाच्या उपक्रमांचा, " खराखुरा औद्योगिक वापर " या शब्दप्रयोगामध्ये समावेश करणे राज्य शासनाला इष्ट वाटते.

३. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींन्वये शासनाने विशेष वसाहत विकासाकरिता केलेल्या विनियमांखाली विशेष वसाहत प्रकल्पांचा शीघ्रतेने विकास करण्याच्या दृष्टीने खाजगीकरण व खाजगी क्षेत्राचा सहभाग या संकल्पनांदेखील शासनाने तत्वतः स्वीकारल्या आहेत. त्यानुसार, शेत जमिनीचे, खाजगी विकासकांनी राज्यात हाती घेतलेल्या, विशेष वसाहत प्रकल्पांच्या वापरासाठी रूपांतर करण्याकरिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलमे ४२ व ४४ अन्वये, जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीची आवश्यकता असणार नाही, अशी तरतूद करण्यासाठीसुद्धा उक्त संहितेच्या कलम ४४ क मध्ये सुधारणा करण्याचे ठरविण्यात आले आहे.

४. भारत सरकारकडून, वेळोवेळी, अधिसूचित करण्यात आलेल्या, पर्यावरण-संवेदनशील क्षेत्राला (Eco-sensitive Zone) उक्त कलम ४४ क च्या तरतुदी लागू न करण्याचे देखील ठरविण्यात आले आहे.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४४ क मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कारवाई करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २८ फेब्रुवारी २००४.

**मोहम्मद फजल,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, मार्च ६, २००४/फाल्गुन १६, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.


## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2004 (Mah. Ord. IV of 2004), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATIMA UMARJI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2004 (Mah. Ord. IV of 2004), published under the authority of the Governor]

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th March 2004.

**MAHARASHTRA ORDINANCE No. IV OF 2004.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966 for the purposes hereinafter appearing ;

Mah. XLI of 1966.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of Article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement. **1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2004.

(*2*) It shall come into force at once.

Amendment of section 44A of Mah. XLI of 1966. **2.** In section 44A of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (hereinafter referred to as "the said Code"),— Mah. XLI of 1966.

(*a*) in sub-section (*1*),—

(i) after clause (*ii*), for the portion beginning with the words "for a *bona-fide* industrial use" and ending with the words "conditions, namely :—" the following shall be substituted, namely :—

"for a *bona-fide* industrial use ; or

(iii) within the area undertaken by a private developer as a special township project,

then, no permission for such conversion of use of land shall be required, subject to the following conditions, namely :—" ;

(ii) in condition (b), after the words "*bona-fide* industrial use" the words "or special township project, as the case may be," shall be inserted ;

(iii) in condition (d), after the words "industry" the words "or special township project, as the case may be," shall be inserted ;

(iv) after condition (e), the following proviso shall be added, namely :—

"Provided that, the provisions of this sub-section shall not apply to the areas notified as the Eco-sensitive Zone, by the Government of India." ;

(*b*) in sub-section (*2*), after the words "*bona-fide* industrial use" the words "or special township project, as the case may be," shall be inserted ;

(*c*) in sub-section (*5*), after the words "*bona-fide* industrial use" the words "or special township project, as the case may be," shall be inserted ;

(*d*) in the *Explanation*, after the words "carried on by any person," the words "or the activity of tourism, within the area notified as the tourist place or hill station, by the State Government," shall be inserted and shall be deemed to have been inserted with effect from the 1st July 2000 ;

(*e*) the existing *Explanation* shall be renumbered as *Explanation I* and after the *Explanation I* so renumbered, the following *Explanation* shall be added, namely :—

" *Explanation II.*—For the purposes of this section, " special township project " means special township project or projects under the Regulations framed for Development of Special Township by the Government, under the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. ". Mah. XXXVII of 1966.

Amendment of section 328 of Mah. XLI of 1966.

**3.** In section 328 of the said Code, in sub-section (*2*), in clause (*xvi-a*), after the words "*bona-fide* industrial use " the words " or special township project " shall be inserted.

STATEMENT

With a view to promote industrial growth and to encourage industrialists to start industries in the State of Maharashtra, the State Government has announced the new industrial policy of 1993. As a part of the said industrial policy, section 44A of the Maharashtra Land Revenue Code, 1966 has been amended by the Maharashtra Act No. XXVI of 1994, so as to provide that no permission of the Collector under sections 42 and 44 of the said Code shall be required for the conversion of the use of land for *bona-fide* industrial use, if the land in question is situated within an industrial zone. The activities to be considered as " the *bona-fide* industrial use " have been incorporated in the *Explanation* added to the said section 44A.

2. In the year 1999, the Government of Maharashtra has declared the " new tourism Policy " in which tourism has been assigned the status of an industry. In order to extend all the benefits of the new industrial policy of 1993 to the tourism industry in the State, the State Government considers it expedient to expressly include tourism activities within the areas notified by the State Government as a tourist place or hill station in the expression " *bona-fide* industrial use ", by suitably amending the *Explanation* to the said section 44A, with retrospective effect, from the 1st July 2000.

3. The Government has also accepted, in principle, the concept of privatisation and private participation for achieving expeditious development of special township projects under the Regulations for Development of Special Township made by the Government under the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, it is decided to amend section 44A of the Maharashtra Land Revenue Code, 1966 so as also to provide that the permission of the Collector under sections 42 and 44 shall not be required for conversion of the agricultural land for the use of special township projects undertaken by the private developers in the State.

4. It is also decided to not to make applicable the provisions of the said section 44A to the Eco-sensitive Zones notified by the Government of India, from time to time.

5. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist

which render it necessary for him to take immediate action further to amend section 44A of the Maharashtra Land Revenue Code, 1966, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 28th February 2004.

MOHD. FAZAL
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. C. JOSHI,
Principal Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई